**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**मंगळवार, दिनांक : २३ एप्रिल, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा उद्या अंतिम दिवस**
2. **भाजपचे अकोला लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार अनुप धोत्रे यांच्या प्रचारार्थ आज गृहमंत्री अमित शाह यांची सभा.**
3. **आज हनुमान जयंती विविध कार्यक्रमांनी साजरी.**

**आणि**

4. **भरारी पथकाच्या कर्मचा-यांची शहानिशा करण्याचं नागपूर महावितरणचं आवाहन.**

######

**दूसरा टप्पा प्रचार संपणार**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार उद्या संपणार आहे. या टप्प्यात येत्या २६ तारखेला मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या बुलडाणा, अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ - वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी या मतदारसंघांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर या मतदारसंघांमध्ये सर्वच पक्षांचे दिग्गज नेते प्रचारसभा घेत आहेत.

केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची उद्या अमरावती मध्ये भाजप उमेदवार नवनीत राणा यांच्या प्राचारासाठी सभा होणार आहे.

आज अमरावतीच्या मोमीनपुरा इथं वंचित बहुजन आघाडी समर्थित अपक्ष उमेदवार आनंदराज आंबेडकर यांच्या प्रचारार्थ सभा होणार असून या सभेला एमआयएम पक्षाचे नेते इमतीयाज जलील यांची उपस्थिती राहणार आहे.

तर काँग्रेस नेते राहुल गांधी उद्या दुपारी महाआघाडीचे अमरावती लोकसभेचे उमेदवार बळवंत वानखेडे यांच्या प्रचारार्थ भारत जोडो यात्रा मैदान, बैतूल रोड, परतवाडा इथं जाहीर सभेला संबोधित करणार आहे.

दरम्यान आज अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे इथं झालेल्या प्रचार सभेत 'नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशातील प्रत्येक व्यक्तीचा विचार करत विविधांगी योजनांची अंमलबजावणी करत नागरिकांना लाभ दिल्याने समाजातील प्रत्येक घटकातून येणाऱ्या

प्रतिक्रिया या सुखद असल्याचं प्रतिपादन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनी केलं .

वर्धा लोकसभा मतदारसंघाचे विद्‌यमान खासदार आणि भारतीय जनता पक्षाचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारासाठी अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे इथं आयोजित केलेल्या सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी त्यांनी इंडिया आघाडीवर निशाणा साधला.

**अमित शहा**

मोदींना तिसऱ्यांदा विजयी करण्यासाठी आणि त्यांचा विजय अधिक बळकट करण्यासाठी अकोल्याचे महायुतीचे उमेदवार अनूप धोत्रे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचं आवाहन अमित शाह यांनी केलं. भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज सायंकाळी अकोला इथं महायुतीचे उमेदवार अनूप धोत्रे यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. त्यावेळी ते बोलत होते. सुरवतीला गजानन महाराज आणि गाडगे बाबांच्या भूमीला नमन करीत असल्याचे ते म्हणाले. मोदींच्या कार्यकाळात बहूप्रतीक्षित राम मंदिर झाल्याचा उल्लेख त्यांनी केला.

सुरवातीला अनुप धोत्रे यांनी केंद्र आणि राज्य सरकार यांच्या संयुक्त विद्‌यमाने राबविलेल्या विकास योजनांची माहिती दिली. शेतकरी, नोकरदार वर्ग, बेरोजगार यांच्या समस्या प्रथमिकतेवर सोडवू असं आश्वासन त्यांनी दिलं. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांनी देखील धोत्रे यांना बहुमाताने विजयी करण्याचं आवाहन त्यांनी केलं.

या मतदारसंघात काँग्रेसचे डॉ. अभय पाटील, तर वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्यासह १७ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. दरम्यान हवामान खत्यानं जारी केलेल्या अंदाजानुसार सभेदरम्यान पावसाच्या सारी बरसत आहे.

**बच्चू कडू**

उद्‌या अमरावती इथं होणाऱ्या अमित शहा यांच्या सभेची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे मात्र सदर मैदान आम्ही आरक्षित केल्याचा मुद्‌दा समोर करत प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी आमचे मैदान आम्हाला परत करा अन्यथा आम्ही सभा उधळून लावू असा पवित्र घेतला त्यामुळे या ठिकाणी प्रहारचे कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

**अतुल लोंढे**

भारतीय जनता पक्षाचे नागपूर मतदारसंघाचे उमेदवार नितीन गडकरी यांनी प्रचारासाठी शाळकरी मुलांचा वापर केल्याच्या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगानं NSVM

फुलवारी शाळेच्या संचालकावर कारवाई करण्याचे निर्देश दिले, परंतु नितीन गडकरी यांच्यावर कारवाई केलेली नाही. शाळा संचालकांना दोषी ठरवून कारवाई होत असताना नितीन गडकरी यांच्यावर कारवाई कधी करणार? असा प्रश्न प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

यासंदर्भात माहिती देताना अतुल लोंढे म्हणाले की, दिनांक १ एप्रिल २०२४ रोजी NSVM फुलवारी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना दुपारी १२ ते १ वाजे दरम्यान वैशाली नगर भागात भाजप उमेदवार नितीन गडकरींच्या प्रचार रॅलीत सहभागी केले होते.

**चौथा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्पात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत परवा २५ तारखेला संपत आहे. २६ तारखेला अर्जांची छाननी होईल, तर २९ तारखेपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. या टप्प्यात दहा राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या एकूण ९६ मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांचा समावेश आहे.

अहमदनगर लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहे.

**मतदान केल्यास सवलत**

वाशिम जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच मतदान 26 एप्रिल रोजी होणार आहे. मतदान करून आलेल्या मतदारांना इंडियन मेडिकल असोसिएशन तर्फे 26, 27 आणि 28 एप्रिल रोजी ओपीडी तपासणी मध्ये 50 टक्के सवलत देण्याचा निर्णय असोसिएशनकडून घेण्यात आल्याचं आय एम ए चे अध्यक्ष डॉ. संतोष सारडा आणि सचिव डॉ. सोना नेनवानी यांनी कळविलं आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी, शेवटच्या मतदारानं आपला हक्क बजवावा या उद्देशानं जिल्हा प्रशासन आणि अनेक संस्था वेगवेगळ्या उपक्रमांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक पावले उचलत आहे. याचाच भाग म्हणून इंडियन मेडिकल असोसिएशन वाशिम तर्फे मतदान केलेल्या मतदारास ओपीडीच्या शुल्कात 50% सवलत देण्याचं ठरविण्यात आलं आहे.

त्याचप्रमाणे आज वाशीम शहरात तब्बल दिड किमी अंतराच्या मानवी साखळीतुन मतदार जनजागृती करण्यात आली. यामध्ये जिल्हा प्रशासनातील तब्बल २ हजार अधिकारी आणि कर्मचारी, विविध शाळेचे विद्यार्थी, सामाजिक संघटना, लोककलावंत आणि स्थानिकांनी

सहभाग घेऊन मतदार जनजागृती केली.वाशीम शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक, पाटणी चौक आणि छत्रपती शिवाजी महाराज चौका दरम्यान ही मानवी साखळी आयोजित करण्यात आली .

**सर्वोच्च न्यायालय**

शासकीय नोकरीतल्या महिलांना अपंग मुलाची काळजी घेण्यासाठी बाल संगोपन रजा नाकारणं हे सरकारच्या घटनात्मक कर्तव्यांचं उल्लंघन असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. हिमाचल प्रदेश मधल्या एका प्राध्यापक महिलेनं आपल्या अपंग मुलाची काळजी घेण्यासाठी केलेला रजेचा अर्ज संबंधित संस्थेनं मंजूर केला नव्हता. या प्रकरणी या महिलेनं दाखल केलेल्या याचिकेची सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जे. बी. पर्डीवाला यांच्या खंडपीठासमोर झाली.

बाल संगोपन रजा हा एक महत्त्वाचा घटनात्मक अधिकार असूनही अनेक महिलांना तो नाकारला जातो आणि कामाची समान संधी दिली जात नाही. अपंग मुलांच्या मातांसाठी ही बाब गंभीर असल्याचं न्यायालयानं यावेळी सांगितलं.

**'लोकनिर्णय महाराष्ट्राचा'**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण सोलापूर, माढा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**हनुमान जयंती**

राम भक्त श्री हनुमान यांचा जन्मोत्सव देशभरात मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. ठिकठिकाणच्या मंदिरांमध्ये पहाटेपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. नागपूर नजीक सुप्रसिद्ध जामसावळी हनुमान देवस्थान तसंच संकटमोचण मंदिर वर्धमान नगर आणि हनुमान मंदिर जरीपटका इथं देखील महाआरती, भजन-कीर्तन आणि महाप्रसादचे आयोजन करण्यात आलं आहे.

नागपुरातील प्रसिद्ध असलेल्या टेकडी रोडवरील हनुमानाचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दर्शन घेतलं तसंच पूजा आणि आरती केली. यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना हनुमान जयंतीच्या पर्वावर बजरंग बली यांना बुद्धी आणि शक्ती मागितली असल्याचं त्यांनी सांगितलं. आज राजाबक्षा हनुमान मंदिरापासून भव्य मिरवणूक देखील काढण्यात आली. मिरवणुकीत ६० पेक्षा अधिक चित्ररथांचा समावेश होता. याप्रसंगी सुप्रीम कोर्टाचे

माजी मुख्य न्यायाधीश शरद बोबडे, मुंबई उच्च न्यायालयाचे प्रशासकीय न्यायाधीश नितीन सांबरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंघल, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

गोंदिया शहरातील सिव्हिल लाईन्स येथील हनुमान मंदिरात मागील पाच दिवसापासून विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पहाटे पाच वाजेपासून अभिषेक करण्याकरता लोकांच्या लांबच लांब रांगा दिसून आल्या.

बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा इथं नागपूर -- मुंबई या राष्ट्रीय महामार्गावर देशातील सर्वात मोठी १०५ फुट उंच अशी महाकाय हनुमानाची मूर्ती आहे. हनुमान जयंती निमित्य याठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी या महाकाय मूर्तीला जलाभिषेक करण्यात आला. होम हवन आणि भाविकांसाठी याठिकाणी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

**महावितरण**

महावितरणच्या सुरक्षा आणि अंमलबजावणी, नागपूर परिक्षेत्र कार्यालय अंतर्गत, भरारी पथकाद्वारे विज मिटरची नियमितपणे तपासणी करण्यात येते. तपासणी दरम्यान भरारी पथकाचे अधिकारी आणि कर्मचारी हे महावितरणचेच अधिकारी आणि कर्मचारी असल्याची खातरजमा करण्यासाठी त्यांच्या ओळखपत्राची मागणी करून शहानिशा करुन तपासणी दरम्यान या करमाचा-यांना सहकार्य करण्याचे आवाहन महावितरतर्फ़े करण्यात आले आहे. महावितरणच्या सुरक्षा आणि अंमलबजावणी, नागपूर परिक्षेत्र कार्यालया अंतर्गत कार्यरत भरारी पथकातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बाबतीत मिटरच्या तपासणी दरम्यान कुठल्याही प्रकारचा गैरप्रकार आढळून आल्यास त्यांनी उपसंचालक (सुरक्षा व अंमलबजावणी), नागपूर परिक्षेत्र कार्यालय, प्रकाश भवन, लिंक रोड, गड्डीगोदाम, सदर, नागपूर तसेच ईमेल ddvsenr@yahoo.in यावर संपर्क साधण्याचे आवाहन देखील महावितरणतर्फ़े करण्यात आले आहे.

#####